**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये**
**दाखल झालेली तक्रार**

**रामाआ - तक्रार क्र. अम- ५१/२०२१**

तक्रारकर्ता श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा.
मु.पो. प्रभात नगर, भोसा रोड, राजू किराणा जवळ, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.

**तक्रार सुनावणी दिनांक - १६/०४/२०२१**

तक्रारकर्ता यांनी दि.२३/०२/२०२१ रोजी आयोगाचे स्तरावर कलम १८ (१)(ग) अन्वये तक्रार दाखल करुन, दि.२१/१२/२०२० रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी ३० दिवसाच्या विहीत मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही तसेच माहिती देखील पुरविली नाही, असे नमुद केले आहे. त्यामुळे संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द दंडात्मक/शास्तीची कारवाई करावी व तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई द्यावी असे निवेदन केले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सुनावणीसंबंधी ई-मेल द्वारे सुचनापत्र पाठवून कलम ७(१) च्या भंगाबाबत खुलासा मागविण्यात आले तसेच दि.१६/०४/२०२१ रोजी ऑनलाईन सुनावणीकरीता बोलावले होते. त्यानुसार सुनावणीस तक्रारकर्ता हजर आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.कुणाल झाल्टे, तहसिलदार हे हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय गौरकार हे हजर आहेत.

अपिलार्थीने केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.२१/१२/२०२० रोजी रितसर माहितीचा अर्ज दाखल करुन, तहसिलदार यवतमाळ यांनी वाळू चोरी करणा-या वाहनावर केलेल्या कार्यवाहीची मागितली होती. तथापि जन

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

माहिती अधिकारी यांचेकडून ३० दिवसाच्या विहीत मुदतीत माहितीचे प्रदान न झाल्याने अपिलार्थीने आयोगाकडे तक्रार दाखल केल्याचे दिसून येते.

उत्तरवादी यांचा खुलासा, प्रकरणातील दाखल कागदपत्रे तसेच आजची गुगल मीट ॲपवरील ऑनलाईन सुनावणी लक्षात घेता, तक्रारकर्ता यांनी दि.२१/१२/२०२० रोजी तहसिलदार यवतमाळ यांनी वाळू चोरी करणारे ट्रक वाहन यांना वाळूसह जप्त करुन तहसिल कार्यालयात जमा केले. त्याबाबत जप्तीनामा, पंचनामा, दंडात्मक कार्यवाही आदेश, वसूलीबाबत भरणा केलेली चालान, फिर्याद(एफआयआर) इत्यादीची माहिती मागितली होती. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी तक्रारकर्त्यास दि.१९/०१/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागणी केलेली माहिती उपलब्ध असून कार्यालयात व्यक्तीशः उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे लेखी कळविले होते. वास्तविक तक्रारकर्ता यांनी सदरची माहिती नोंदणीकृत डाकेद्वारे मागितली आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी त्यांचे माहिती अर्जामध्ये, माहिती शुल्काचा भरणा करण्याबाबत १० दिवसात कळवावे अशी टिप देखील नमुद केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्त्यास माहितीचे एकूण पृष्ट संख्या व त्याकरिता लागणा-या खर्चाबाबत कळवून माहिती पुरविणे आवश्यक होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी कायद्याच्या विपरीत व चुकीच्या पध्दतीने अर्ज हाताळून कलम ७(१) चा भंग केला आहे. तक्रारकर्ता यांना माहितीचे प्रदान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे तक्रार दाखल केली. आजच्या सुनावणीस तक्रारकर्ता व उत्तरवादी उपस्थिती आहे. सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी असे कथन केले की, तहसिलदार यांनी २५ अवैध वाहतुक करणारे टिप्पर व ट्रक पकडून तहसिल परिसरात लावले होते. त्याबाबत अभिलेखावर तक्रारकर्ता यांनी त्याबाबतचे चित्रफीत सुध्दा सादर केले आहे. तक्रारकर्ता यांचे असे म्हणने आहे की, असे वाळू साठे व वाळू वाहतुक करणारे तसेच त्यांची साठवणूक करणारे वाळूमाफीया विरुध्द कार्यवाहीची तरतूद महसूल संहितेमध्ये करण्यात आलेली आहे. तसेच शासनाचे महसूल व वनविभागाने शासन परिपत्रक क्र.गौखनि १०/०३१६/प्र.क्र.२०४/ख दि.१४/०६/२०१७ मध्ये अशी स्पष्ट तरतुद कायम करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहित, १९६६ चे कलम ४८(७) मध्ये अवैध उत्खनन केल्यास गौण खनिजाच्या बाजारमुल्याच्या ५ पट पर्यंत दंड करण्याची तरतूद आहे. तसेच कलम ४८(८) मध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खननाकरीता वापरण्यात आलेली यंत्र सामग्री वाहतुकीकरीता वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्याची सुध्दा तरतुद आहे. याबाबत शासन परिपत्रक त्यांनी त्यांचे मुळ तक्रारी सोबत जोडलेली आहे. सदर परिपत्रकाचे विस्तृत अवलोकन आयोगाने केलेले आहे. तक्रारकर्त्यास अद्यापही माहितीचे प्रदान झालेले नाही. त्यामुळे तहसिलदार यांचेकडून अशी कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक व्यापक जनहित साध्य करणारी आहे. तसेच राज्य शासनाचा जो महसूल आहे तो तहसिलदार व महसूली अधिकारी यांनी चुकीची कार्यवाही करुन व अवैध वाळू उपसा करणारे वाळू

माफिया यांना संरक्षण देणारी असल्यामुळे तक्रारकर्त्याने माहिती मागितली होती. तक्रारकर्त्याने लावलेल्या गंभीर आरोपावर उत्तरवादी यांना विचारणा केली असता ते कोणताही सकारात्मक खुलासा करु शकले नाहीत. त्यामुळे तक्रारकर्त्याचे कथनामध्ये तथ्यांश दिसून येते. तसेच तक्रारकर्ता यांनी शासनाचे सादर केलेल्या परिपत्रकाचे अवलोकन केले असता त्यामध्ये खालील प्रमाणे मुद्दे आहेत.

१. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४८(७) मध्ये, अवैध उत्खनन/ वाहतूक केलेल्या गौण खनिजाच्या बाजारमुल्याच्या ५ पटी पर्यंत दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच कलम ४८(८) मध्ये, गौण खनिजाच्या अवैध उत्खननाकरीता वापरण्यात आलेली यांत्रसामग्री व वाहतुकीकरीता वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

सदर तरतुदीनुसार गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या प्रकरणात अवैध उत्खनन किंवा वाहतूक करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या बाजारभावाच्या आधारे दांडात्मक आकारणी करण्यासाठी, जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील प्रत्येक गौण खनिजाच्या बाजारभावाची सरासरी काढून, दरवर्षी १ जानेवारी रोजी प्रत्येक गौण खनिजाचे बाजारभाव निश्चित करावे व त्यानुसार सांबंधीत गौण खनिजाच्या दंडाच्या रकमेची परिगणना करण्यात यावी आणि प्रकरणपरत्वे दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी संबंधीतांना नोटीस देवून त्यांची बाजू ऐकून घेऊन कायद्यातील तरतुदीनुसार स्वयांस्पष्ट आदेश पारित करण्यात यावेत.

(ii) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी " महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्यविषयक गुन्हेगारि, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम, १९८१" मध्ये महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५/२०१६ अन्वये सुधारणा करण्यात आली असून, आता सदर अधिनियमात "वाळू तस्कर" या संज्ञेचा समावेश करण्यात आला आहे. याबाबतची सुधारणा करण्याकामी प्रथम सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३, दि. ०१/१२/२०१५ रोजी व नंतर सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, दि. २९.१.२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. यापूर्वी वाळूचे अवैध उत्खनन वा वाहतूक केल्याबद्दल गुन्हा नोंदविलेल्या इसमाकडून पुन्हा तोच गुन्हा घडल्यास अशा इसमाविरुध्द सदर अधिनियमातील तरतुदीनुसार पोलीसांच्या मदतीने प्रतिबांधात्मक स्थानबध्दतेची कारवाई करण्याबाबत विचार करण्यात यावा.

(iii) गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीविरूध्द प्रभावी कारवाई करण्याच्या दृष्टीने संदर्भाधीन क्रमांक ५ येथील शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा पोलीस

अधीक्षक/पोलीस आयुक्त, प्रादेशिक परिवहन अधिकारी व जिल्हा खनिकर्म अधिकारी यांची समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दरमहा आयोजीत करण्यात यावी व गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होणार नाही याबाबत महसूल, पोलीस व परिवहन अधिकारी सतत दक्ष राहतील अशी वातावरण निर्मिती करण्यात यावी.

(iv) गौण खनिजाच्या अवैध वाहतूकीच्या प्रकरणात जप्त करण्यात आलेल्या वाहनांचा परवाना नियमानुसार निलबित करण्याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. मात्र करण्यापूर्वी सबंधित वाहनमालकाची बाजू ऐकून घेवून वाहन अवैध वाहतूकीसाठी प्रत्यक्षात वापरल्याची खातरजमा करुन घ्यावी.

(v) गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतूक निदर्शनास आल्यास, सबंधितत तलाठी / मंडळ अधिका-यांनी त्यांच्या स्तरावर प्रतिबांधात्मक कारवाई करावी आणि काही कारणास्तव ते शक्य होत नसल्यास, त्यांनी अशा बाबींची माहिती तात्काळ संबंधित तहसिलदार, उप विभागीय अधिकारी, जिल्हा खनिकर्म अधिकारी, उप जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांना विविध उपलब्ध संपर्क माध्यमाद्वारे (उदा. दूरध्वणी, एस.एम.एस, व्हॉटसॲप इ. द्वारे) न चुकता द्यावी. अशा अवैध उत्खननाबाबत माहिती मिळताच त्यावषयी संबधित अधिका-यांनी पोलीसांच्या मदतीने नियमानुसार विनाविलंब कारवाई करण्याची दक्षता घ्यावी.

(vi) गौण खनिजाच्या उत्खननचा / साठ्याचा पंचनामा करतांना लिलावधारक किंवा परवानाधारक किंवा खाणपट्टाधारक किंवा साठाधारक किंवा संबंधित व्यक्ती यांच्या व पंचाच्या उपस्थितीत पंचनामा करुन, त्या संदर्भतील पंचनाम्याच्या प्रती संबंधिताना देऊन त्या अनुषंगाने त्यांची बाजू मांडण्याची योग्य ती सांधी देण्यात यावी. त्याकरिता प्रचलित नियमातील तरतूदी विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(vii) गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीबाबत कारवाई करताना सदर गौण खनिज कुठून आणले आहे याचा आवर्जून शोध घेण्यात यावा व शोधाअंती असे गौण खनिज अवैध असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित लिलावधारक/ खाणपट्टाधारक / परवानाधारक यांच्या विरुध्द ही कारवाई करण्यात यावी.

(viii) स्थानिक पातळीवर वाळू अथवा इतर गौण खनिजांची चोरी रोखण्यासाठी भरारी पथके नेमावीत. या भरारी पथकांमध्ये महसूल, पोलीस व परिवन या तिन्ही खात्यातील कर्मचाऱ्यांचा समावेश असेल. तसेच जिल्हाधिकरी/संबंधीत तहसिलदा हे भरारी पथकाच्या समन्वयाचे काम करतील. या भरारी पथकांनी वाळू/इतर गौण खनिजांच्या चोरीची सांभाव्य ठिकाणे निश्चित करुन त्या ठिकाणी अचाणक धाडी टाकाव्यात व वाळू/इतर गौण खनिजांचे ज्या ठिकाणी अवैध अथवा

अनधिकृतनित्या उत्खनन अथवा वाहतूक होत असल्याचे आढळेल, तेथे संबंधिता विरुध्द दंडनिय तसेच मुद्देमाल जप्तीची कारवाई करावी व त्यांच्याकडून नियमानुसार स्वामित्वधन अधिक दंडाची रक्कम वसूल करावी.

(ix) गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्याकरिता जिल्हा व तालुका स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या दक्षता पथकांनी खाणपट्टे व वाळूगटांना भेट देवून तपासणी करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. जिल्हाधिकारी/उप जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी सदर कार्यक्रमाचे व्यक्तिश: काटेकोरपणे सनियंत्रण करावे.

(x) जिल्हा स्तरावरील दक्षता पथकांनी केलेल्या तपासणीचा जिल्हाध्किा-यांनी दरमहा आढावा घ्यावा. तालुका स्तरावरील दक्षता पथकाने केलेल्या तपासणीची नोंदवही तहसिल स्तरावर ठेवण्यात यावी व उप विभागीय अधिका-यांनी सदर दक्षता पथकांनी केलेल्या तपासणीचा दरमहा आढावा घेऊन सनियंत्रण अनधक परिमाणकारक होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती कार्यवाही करावी.

(xi) गौण खनिजांच्या अवैध उत्खनन/वाहतूकीबाबतची जी प्रकरणे उधिकीस येतील. त्या प्रकरणात संबंधित ठेकेदार / लिलावधारक / खाणपट्टाधारक / परवानाधारक / वाहनचालक दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावीच, परंतु त्याचबरोबर सदर घटना अथवा प्रकरण ज्या महसूल अधिकारी/कर्मचारी यांच्या कायगक्षेत्रात उघडकीस आले आहे ते अधिकारी/कर्मचारी सदर प्रकरणास जबाबदार आहेत किंवा कसे याचीही कसून तपासणी करण्यात यावी. जर तपासणीअंती संबंधित अवैध उत्खननास/वाहतूकीस स्थानिक अधिकारी/कर्मचारीसुध्दा जबाबदार आहेत असे आढळल्यास त्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावरही त्याप्रमाणे जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यानवरुध्दही प्रचलित नियमानुसार त्वरित शिस्तभांगविषयक कारवाई सुरु करावी.

(xii) त्याचप्रमाणे गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांसोबत महसूल, पोलीस व परिवहन विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे संगनमत आढळून आल्यास अशा संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून त्यांच्या विरुध्द कठोरतम कारवाई करण्यात यावी.

(xiii) ज्या भागात अवैध उत्खननाच्या घटना जास्त प्रमाणात आढळून येत असतील व अशा भागातील महसूल विभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे प्रतिबांधात्मक प्रयत्न अपूर्ण आढळत असतील अशा अधिकारी/कर्मचारी विरुध्द वैयक्तिक जबाबदारी निश्चित करून शिस्तभांगाची कठोर कारवाई हाती घेऊन, अशी कारवाई जास्तीत जास्त ३ महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

अशी गंभीर तरतुद शासनाद्वारे केली असतांना सूध्दा जिल्हा स्तरावर वरिष्ठ अधिकारी हे या परिपत्रकावर कोणतीच कार्यवाही करित नाहीत. तसेच तहसिलदार व महसूली अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी कामालीचा बेजबाबदार पणा दाखविता आहे व माहिती अधिकार अधिनियमाचे तरतुदीचे उत्तरवाद यांनी उल्लंघन सुध्दा केले आहे. तसेच त्यांचे नैतीक कर्तव्य यामध्ये सुध्दा कसूर झाल्याचे आयोगाचे निदर्शनास येत आहे. राज्य शासनाचा महसूल वाढविणे व अवैध वाहतूक तसेच अवैध उत्खनन करणा-यावर, साठवणूक करणा-यावर कडक कार्यवाही करण्याची तरतूद राज्य शासनाद्वारे केल्या नंतर सुध्दा अशी कार्यवाही न करणे ही अत्यंत गंभीर व कर्तव्यात कसूर करणारी बाब आहे. यामुळे शासनाच्या महसूली निधीचा मोठ्या प्रमाणात नुकसान होते. तसेच वाळु माफीयांचे अवैध वाळू साठवणुकीमुळे त्यांचे मनमाणी दराने वाळूची विक्री केली जाते. तसेच गरजुवंताना त्रास देखील सहन करावा लागतो. तसेच या अवैध वाळूमाफीयामुळे पर्यावरण व रस्ते इत्यादीचे नुकसान तर होतच आहेत. परंतु आगामी १, २ वर्षात असेही निदर्शनास आले की, यांचेद्वारे तपासणी करणारे वरिष्ठ महसुली अधिकारी तसेच माहिती मागणारे आरटीआय कार्यकर्ता यांचेवर गंभीर स्वरुपाची हल्ले देखील होत आहेत. याबाबत वृत्तपत्रात तसेच दुरचित्र वाहिण्यात अनेक बातम्या प्रसिध्द आलेल्या आहेत. वाळू माफिया व अवैध उत्खनन यांची मजल आता अधिकारी/कर्मचारी यांचेवर मारहाण करण्याची पाळी आलेली आहे. तसेच अवैध वाळू व गौण उत्खनन वाहतूक करणारे वाहनांवर तहसिलदार यांनी संबंधित शासन परिपत्रकानुसार कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी आयोगाद्वारे गंभीर दखल घेण्यात येत आहे. सबब, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९(१०) नूसार खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

१. तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहितीची पुर्तता होत नाही.

२. जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार यांनी चुकीच्या पध्दतीने अर्ज हाताळून कलम ७(१) चा भंग केला म्हणुन त्यांना केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) व १९(८)(ग) नुसार रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) ची शास्ती करण्यात येते. जन माहिती अधिकाऱ्याचे आहरण व संवितरण अधिकारी तथा तहसिलदार यांनी सदर शास्तीची रक्कम १ महिन्याचे आत वसूल करून तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी तक्रारकर्ता यांनी सादर केलेले कागदत्रे व अवैध वाळू वाहतुक करणारे ट्रक तहसिल कार्यालयात जप्त करुन त्यांचेवर कोणतीही कार्यवाही न करुन सोडून दिले असल्यामुळे या अधिनियमाचे कलम १९(८)(क), २५(५) व २५(५)(छ) नुसार सचिव, महसूल व वनविभाग यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणात व यवतमाळ

जिल्ह्यात होत असलेल्या अवैध वाळू व त्याच्या साठ्याबाबत विभागीय आयुक्तामार्फत विशेष चौकशी करुन तहसिलदार यवतमाळ यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही ३ महिन्यात पुर्ण करुन तसेच शासन परिपत्रक क्र.गौखनि १०/०३१६/प्र.क्र.२०४/ख दि.१४/०६/२०१७ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांचेस्तरावर कडक सूचना देवून तसा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावे.

४. जिल्हाधिकारी यवतमाळ, पोलीस अधिक्षक, यवतमाळ व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यवतमाळ यांना या अधिनियमाचे कलम १९ (८)(क) व २५(५) नुसार आदेशीत करण्यात येते की, त्यांनी महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचे परिपत्रक क्र.गौखनि १०/०३१६/प्र.क्र.२०४/ख दि.१४/०६/२०१७ या परिपत्रकान्वये १ महिन्यात कार्यवाही करुन तसा अनुपालन अहवाल या आयोगास सादर करावा व भविष्यात सबंधित शासन परिपत्रकाची अवहेलना होणार नाही याची दखल घ्यावी.

५. केंद्रीय माहितीचा अधिकर अधिनियम, २००५ चे कलम १९(१०) नुसार राज्य माहिती आयोगाने पारित केलेला प्रत्येक आदेश कलम १९(७) नुसार संबंधित सार्वजनिक प्राधिकरणावर निर्धारित वेळेत अनुपालन करण्यासाठी अंतिम व बंधनकारक आहे. जर पारित आदेशाचे अनुपालन न करून अवमान केल्यास प्राधिकरणाचे संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १६६ नुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

(संभाजी सरकुंडे)
**राज्य माहिती आयुक्त, अमरावती.**

जा.क्र.त. ५१/२०२१/ २२०९ /२०२१, दिनांक- २८/०६/२०२१

प्रत :- अपिल शाखा.

१. सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई -४०००३२.
२. सचिव, गृहविभाग मंत्रालय विस्तार, मुंबई -४०००३२.
३. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.
४. पोलीस अधिक्षक, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.
५. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ, ता.जि.यवतमाळ.

इंगळे.